मुलांनो एकदा जोरदार घोषणा देऊया.

छत्रपती शिवाजी महाराज की जय!

तुम्हांला सर्वांना शिवाजी महाराज आवडतात का?

आवडतात. का बरं आवडतात?

बरं शिवाजी महाराजांसोबत एका जातीचे मावळे होते की सगळ्या?

एका धर्माचे मावळे होते की सगळ्या?

बरं मला सांगा शिवाजी महाराजांसाठी सर्व जाती-धर्माचे मावळे जीव द्यायला का तयार होते?

हे समजून घेण्यासाठी आपण त्यांच्या काही गोष्टी ऐकूया.

पुण्यापासून ३० किमी अंतरावर खेड शिवापूरजवळ एक रांझे नावाचं गाव आहे. त्या गावचा पाटील होता बाबाजी भिकाजी गुजर. त्या पाटलाने एका शेतकऱ्याच्या पोरीवर हात टाकला. म्हणजे अत्याचार केला. अत्याचारानंतर त्या मुलीने स्वत:चे प्राण दिले. आतमहत्या केली. सगळ्या गावाला दु:ख झाले पण कुणीही पाटलाविरोधात बोलायला तयार नव्हते. कुठूनतरी छत्रपती शिवाजी महाराजांना ही बातमी कळली. महाराजांनी सैनिकांना आज्ञा केली, “ जा आणि त्या पाटलाच्या मुस्क्या बांधून आणा.” मुस्क्या कुणाच्या बांधतात माहीत आहे ना? बैलाच्या तोंडाला बांधतात. म्हणजे त्याला तोंडही उघडता आले नाही पाहिजे.

महाराजांच्या समोर पाटलाला आणले आणि पाटलाचा चौरंगा केला. म्हणजे त्याचे हाय पाय तोडायची शिक्षा दिली. पुढे महाराजांनी सांगितले, “याला कसबा गणपती मंदिराच्या बाहेर ठेवा आणि येणाऱ्या जाणाऱ्या लोकांनी याच्या अंगावर थुंका. तसेच नवऱ्यासमोर अत्याचार केला म्हणून सकाळ संध्याकाळ 5-5 चाबकचे फटके द्या.”

मला सांगा जेव्हा ही बातमी पुण्यात, पुण्याच्या आजूबाजूच्या गावांमध्ये पसरली असेल तेव्हा त्या गावातील लोकांना के वाटलं असेल? त्यांना आनंद झाला असेल की नाही? त्यांना वाटलं असेल की नाही आम्ही मेलो तरी चालेल पण हा राजा जगला पाहिजे.

म्हणजे महाराजांनी महिलांची काळजी घेतली म्हणून लोकं त्यांच्या साठी जीव द्यायला तयार होते.

दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे महाराजांनी शेतकऱ्यांची काळजी घेतली. ज्यांना जमीन नाही त्यांना कोरस – जमीन दिली. ज्यांना खायला अन्न नाही त्यांना कोरस – अन्न दिले. ज्यांना नांगर नाही

त्यांना कोरस – नांगर दिला. ज्यांना बैल नाही त्यांना कोरस – बैल दिले. ज्यांच्याकडे खत नाही त्यांना कोरस – खत दिले.

त्यामुळे शेती चांगली झाली. शेतकऱ्यांचे पीक वाढले. म्हणजे महाराजांनी शेतकऱ्यांची काळजी घेतली, म्हणून लोक त्यांच्यासाठी जीव द्यायला तयार होते.

महाराजांनी सैनिकांना सांगितले की स्वराज्याचे सैनिक पिकामधून न जाता शेताच्या कडेकडेने गेले पाहिजे. म्हणजे महाराजांनी शेतकऱ्याच्या पिकांची काळजी घेतली. म्हणून लोक त्यांच्यासाठी जीव द्यायला तयार झाले.

आता कळलं ना की मावळे जीव द्यायला का तयार होते.

आता तुम्ही सर्वात जास्त ऐकलेल्या गोष्टीबद्दल म्हणजे अफजलखानाच्या बद्दल. महाराजांनी अफजलखानाला काय केलं? त्याचा कोथळा बाहेर काढला. बरोबर? मला सांगा अफजलखानाला मारल्यानंतर पुढे काय झालं?

आम्ही महाराजांवर एक नाटक केलं होतं. त्यात दुसऱ्या मित्राला विचारलं की खानाला मारल्यानंतर पुढे काय झालं?

तो काय म्हणे? (एकदम गंभीर आवाजात आणि हळू गतीने) **“खान असा आडवा पडला. त्याला बोलताच येत नव्हतं. त्याचे हात पाय हालत नव्हते. म्हणजे तो मेला होता.”** मग आम्ही त्याच्या डोक्यात मारलं आणि म्हटलं (गंभीर आवाजात आणि हळू गतीने) **“याचा अर्थ तुला याच्या पुढचं काहीच माहीत नाही.”**

पुढे काय झालं माहीत आहे का? महाराजांनी खानाच्या 2 मुलांना सोडून दिले. अफजलखानाची कबर बांधली आणि पैसे देऊन कबरीसाठी दिवाबत्तीची सोय केली.

म्हणजे महाराजांनी धर्माचा भेदभाव केला का? नाही.

त्यांची एक आज्ञा आहे ती सर्वांनी माझ्या मागे म्हणा, “ज्याचा जो धर्म असेल त्याने तो करावा, कुणीही त्यात भांडण उभे करू नये.”

आवडली का महाराजांची माहिती? माझ्या मागे मोठ्याने घोषणा द्या.

**तुमचं आमचं नातं काय, जय जिजाऊ जय शिवराय !**